कु. रुची हि दामले विद्यालय, रत्नागिरी या शाळेमध्ये इयत्ता दुसरीमध्ये शिक्षण घेत आहे. तिच्या शाळेची वेळ स. १०:२० ते सा. ५:३० अशी आहे. शाळा रत्नागिरी येथे असल्याने सुमारे अर्धा ते पाऊण तास कु. रुची हिला शाळेमध्ये यावे लागते. अशा परिस्थितीत मे. न्यायालयाने केलेल्या आदेशाची पूर्तता करणे अशक्य बनले आहे.

४) नि. २४ येथे ज्या कालावधीमध्ये आदेश करण्यात आले, त्या वेळेची परिस्थिती व सध्याची परिस्थिती विचारात घेता कु. रुची हिच्या भवितव्याच्या दृष्टीने तिचे शिक्षण अतिशय महत्त्वाचे असल्याने मे. न्यायालयाने केलेल्या आदेशामध्ये बदल करणे व शालेय सुट्टीच्या दिवशी कु. रुची हिची भेट यांस सामनेवाला यांस देणे कु. रुची हिच्या भवितव्याच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे.

५) तरी अर्जदार हिची विनंती अशी की, नि. २४ येथील आदेशामध्ये बदल करण्यात येऊन सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सार्वजनिक स्थळी कु. रुची हिची भेट सामनेवाला याने घेणेबाबत आदेश करण्यात यावेत.

येणेप्रमाणे अर्ज आहे.

रत्नागिरी
दि. १८/०६/२०२४

(ॲड. एस. एस. कदम
थरवळ)

(सौ. प्रज्ञा रामचंद्र कदम)

Heard the application. Application is not supported with affidavit. Moreover school details or documents also not filed on record. Hence the application is filed.

24/6/2024